तरुण भारत संवाद
बुधवार, १ नोव्हेंबर २०२३

# श्रेया, सृष्टीची विद्यापीठ तायक्वांदो संघात निवड

## महाविद्यालयाकडून विद्यार्थीनींचा सत्कार

प्रतिनिधी

कोल्हापूर

सातारा येथे झालेल्या आंतरविभागीय शिवाजी विद्यापीठ बुध्दीबळ स्पर्धेतून सृष्टी कुलकर्णी (बीबीए भाग १) या विद्यार्थिनीची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी विद्यापीठ संघात निवड झाली. तसेच श्रेया बराले (बी ए भाग १ ) हिची निपाणी येथे झालेल्या आंतरविभागीय शिवाजी विद्यापीठ तायक्वांदो स्पर्धेतून राज्यस्तरीय विद्यापीठ संघात निवड झाली.




कोल्हापूर : सृष्टी कुलकर्णी, श्रेया बरालेचा सत्कार करताना प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार. सोबत प्रा. एन. आर. हवलदार, प्रा. सहिदा कच्छी.

या यशाबद्दल त्यांचे स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्था सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे, संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

दोन्ही खेळाडूना जिमखाना प्रमुख प्रा. एन. आर. हवलदार, प्रा. सहिदा कच्छी, प्रा. संतोष कुंडले, प्रा. समिर पठाण, विश्वास बराले यांचे मार्गदर्शन लाभले.

P
01/11/2023

1.11.23